# माहितीचा अधिकार अधिनियम २००५.खंड ४ (१) (ब) (७ )

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय मुंबई येथिल वाहतुक खात्याचे धोरण तयार करण्याच्या किंवा अंमलबजावणी करण्याच्या संबधांत लोकांशी विचार विनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेचा तपशिल.**

| अ.क्र. | सल्ला मसलतीचा विषय | कार्यप्रणालीचे विस्तृत वर्णन | अधिनियम / नियम / परिपत्रक | पुनरावृती काळ |
|---|---|---|---|---|
| | | **वाहतूक खाते** | | |
| १ | प्रवासी दिन | प्रवासी प्रवासी हा केंद्रबिंदू मानून त्यांच्या अडीअडचणीचां तत्काळ निपटारा व्हावा, या हेतूने ''प्रवासी तक्रार दिवस'' ही संकल्पना अंमलात आणलेली आहे. या अंतर्गत प्रत्येक आगारात प्रत्येक मंगळवारी, विभागीय कार्यालयात प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी, मध्यवर्ती कार्यालय येथे तिसऱ्या बुधवारी प्रवासी अदालत आयोजित करण्यात येऊन प्रवाशांच्या तक्रारी / सूचना यांची दखल घेण्यात येते. | रा.प. परिपत्रकानुसार | आगारात प्रत्येक मंगळवारी , विभागीय कार्यालयात महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी, मध्यवर्ती कार्यालय येथे तिसऱ्या बुधवारा |
| | | **नियोजन व पणन खाते** | | |
| २ | नाथजल पाणी बाटली प्रकल्प | रा.प. प्रवाशी जनतेला अल्पदरामध्ये बसस्थानकावर पाणी उपलब्ध व्हावे या उदात्त हेतूने राज्य परिवहन महामंडळाने नाथजल पाणी बाटली प्रकल्प सुरू करण्याबाबत प्रथमत:रेल्वे वाहतूकीमधील त्यांचे कार्यालयाला भेटी देण्यात येवून रेल्वे नीर या प्रकल्पाची विस्तृत माहिती घेण्यात येऊन रेल्वे नीर या प्रकल्पापेक्षा प्रवाशांचे हित व रा.प. महामंडळाला त्यातून उत्पन्न मिळावे म्हणून वेगळ्या धरतीवर नाथजल पाणी बाटली प्रकल्प तयार करण्यात आला.व या करीता ई-निविदेद्वारे निविदा मागवून नाथजल पाणी बाटली प्रकल्पाच्या पुरवठादाराची नेमणूक करण्यात आली आहे. | क्र/राप/निवप/ वा.आ./वाणिज्य/ परि./क्र./०२ -३०७१ दि.१०.११. २०२० | ----- |